फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३२/२०२२
CNR.No.MHPU170011802022
(मंगल संतोष विघ्ने वि. संतोष संभाजी विघ्ने)

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५(१) अन्वये दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज, त्यावरील जाबदेणार यांनी त्यांचे म्हणणे, अर्जदार हिस पोटगी मिळणेकामी दाखल केलेली अभिलेखावरील कागदपत्रे वाचली. अर्जदाराचे व जाबदेणार यांचे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

२. प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथने अशी आहेत की, अर्जदार क्र. १ व जाबदेणार यांचा विवाह दिनांक ०६/१२/२००७ रोजी अर्जदार यांचे आईवडीलांनी सुमारे दोन ते तीन लाख रूपये खर्च करून संसार उपयोगी वस्तु देऊन व जाबदेणार यांना दोन तोळे सोने व वरदक्षिणा म्हणून रक्कम रूपये ५०,०००/— देऊन विवाह करून दिले.

३. लग्नानंतर अर्जदार या जाबदेणार यांचे घरी नांदावयास गेल्या. अर्जदार या जाबदेणार यांचेकडे नांदत असताना जाबदेणार यांचे घरी अर्जदार यांच्या सासु, सासरे, जाऊ, दीर असे एकत्रात राहणेस होते. जाबदेणार यांनी अर्जदार यांना सुरूवातीला दोन ते अडीच वर्षे बऱ्यापैकी नांदविले. त्यानंतर अर्जदार यांना जाबदेणार यांची आईवडील व त्यांचे घरातील लोकांनी मुलबाळ होत नही म्हणून त्रास देणेस सुरूवात केली. जाबदेणार हे अर्जदार यांना म्हणत की, मला तुझ्याशी लग्न करायचे नव्हते परंतु माझे आईवडिलांनी बळजबरीने तुझेशी लग्न लावून दिले, तु आडाणी आहेस, ग्रामीण गावडळ आहेस असे म्हणून मानसिक व शारिरीक छळ करू लागले. असे असताना देखील अर्जदार या जाबदेणार यांचेकडे व्यवस्थितरित्या पत्नी म्हणून सर्व कर्तव्ये व जबाबदारी पार पाडीत होत्या. दरम्यानच्या काळात अर्जदार यांना जाबदेणार यांचेपासून दिवस गेले. दिनांक १०/०९/२०११ रोजी अर्जदार क्र. २ म्हणजेच कृष्णा चा जन्म झाला. त्यानंतर सतत अर्जदार यांच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागले व मारहाण करून उपाशीपोटी ठेवू लागले व म्हणायचे की, तुला कामधंदा नीट येत नाही, तु मला पसंद नव्हती तुझे आईवडीलांनी आमचा मानपान केला नाही असे म्हणून ४ ते ५ वेळा मारहाण केली व हाकलून दिले.

४. त्यानंतर अर्जदार यांचे आईवडीलांनी जाबदेणार यांची समजूत काढून नांदावयास पाठविले. परंतु जाबदेणार व त्यांचे आईवडीलांमध्ये काहीही फरक पडला नाही. जाबदेणार यांचे आईच्या सांगण्यावरून जाबदेणार हे अर्जदार यांना मारहाण करून सतत उपाशी ठेव लागले व रात्री अपरात्री उशीरा घरी येऊन अर्जदार यांना मारहाण करू लागले. अर्जदार या त्यांच्या आईवडीलांना झाला प्रकार सांगितला. त्यानंतर अर्जदार यांच्या आईवडीलांनी अर्जदार यांची समजूत काढून नांदण्यास सांगितले.

५. दरम्यानच्या काळात अर्जदार या जाबदेणार यांचेपासून दिवस गेले. अर्जदार क्र. ३ श्रेयश याचा जन्म दिनांक ०३/०४/२०१३ रोजी झाला. त्यांनतर तरी जाबदेणार व त्यांचे आईवडीलांचे यांचे वागणेमध्ये काहीएक बदल झाला नाही व अर्जदार यांना म्हणत की, माहेरून व्यवसायासाठी दोन लाख रूपये घेऊन ये, हुंडयातील राहिलेली पैसे घेऊन ये तरच मी तुला नांदविणार अन्यथा मी तुला नांदविणार नाही असे म्हणून घरातून हाकलून दिले. त्यावेळी अर्जदार व त्यांच्या आईवडीलांनी जाबदेणार यांची समजूत काढून आम्ही गरीब आहोत आमचेकडे एवढे पैसे कोठुन येणार असे म्हणून जाबदेणार यांची समजूत काढली व अर्जदार यांना नांदणेस ठेऊन घेणेकामी विनंती केली.

६. त्यानंतर जाबदेणार यांनी अर्जदार यांचेविरूध्द मॅ. पि. नं. १४७/२०२१ हा अर्ज बारामती येथील न्यायालयात दाखल केला. सदर अर्जामध्ये अर्जदार व जाबदेणर यांचेमध्ये तडजोड होऊन जाबदेणार यांनी अर्जदार यांना व मुलांना व्यवस्थित संभाळणेची हमी देऊन नांदणेस घेऊन गेले. त्यानंतर जाबदेणार यांनी अर्जदार यांना मारहाण करून माहेरहून पैसे आणले नाहीत म्हणून मारहाण केली व घराबाहेर हाकलून दिले. त्यानंतर अर्जदार यांनी जाबदेणार यांचेविरूध्द दौंड पोलिस स्टेशनला मारहाण व शिवीगाळ केले बाबत फिर्याद दिली असता जाबदेणार यांनी इंदापूर पोलिस स्टेशनमध्ये अर्जदार यांना व्यवस्थित नांदविण असे सांगून नांदणेस घेऊन गेले. परंतु जाबदेणार यांनी अर्जदार यांना पुन्हा मारहाण व शिवीगाळ करून दिनांक ०६/०४/२०२२

रोजी घराबाहेर हाकलून दिले. त्यानंतर अर्जदार यांनी जाबदेणार यांचेविरूध्द वालचंदनगर पोलिस स्टेशनला भारतीय दंड संहिता कलम ४९८अ प्रमाणे फिर्याद दिली असून त्याचा एन. सी. नं. २१६/२०२२ असा आहे. त्यानंतर अर्जदार या मुलांना घेऊन नांदावयास गेल्या असता जाबदेणार व त्यांचे आईवडील व घरातील लोकांनी अर्जदार यांना घरात न घेता तेथूनच पैसे आणले असतील तरच थांबायचे नाहीतर आल्या पावलांनी परत जा अशी धमकी दिली व मुलांसह हाकलून दिले.

७. त्यानंतर अर्जदार या स्वत: व नातेवाईकांमार्फत ८ ते १० वेळा नांदायला जाणेचे प्रयत्न केले परंतु नांदायला घेऊन जाणार नाही. तुला काय करायचे ते कर अशी धमकी दिली व नांदविणेस नकार दिला. अर्जदार व जाबदेणार हे तरून असून दोघांनाही संसार सुखाची मुलीला वडीलांचे प्रेमाची गरज आहे. अर्जदार यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून त्यांचेवर अर्जदार यांच्या मुलांवर उपासमारीचे दिवस आले आहेत. अर्जदार क्र. २ व ३ हे शिक्षण घेत असून त्यांचे शिक्षणाचा खर्च देखील अर्जदार यांना करावा लागत आहे.

८. याउलट जाबदेणार यांची आर्थिक परिस्थिती चांगली असून जाबदेणार यांचेकडे मौजे पेडगाव देवूळगाव राजे ता. दौंड, जिल्हा पुणे येथे १२ एकर बागायत शेती असून त्यापासून वर्षाला १० ते ११ लाख रूपये उत्पन्न मिळते तसेच जाबदेणार यांचा दुधाचा व्यवसाय असून दुग्ध व्यवसायापासून जाबदेणार यांना ५० ते ६० हजार रूपये महिन्याला मिळतात. त्यामुळे अर्जदार यांना अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रूपये १५,०००/— देणेची विनंती केली. जाबदेणार यांची अर्जदार यांना उचलून पोटगी देण्याची ऐपत आहे.

**जाबदेणार यांचे म्हणणे खालील प्रमाणे**

९. जाबदेणार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १७ खाली दाखल केले आहे. जाबदेणार यांना अर्जदार समवेत दिनांक ०६/१२/२००७ रोजी झालेला विवाह मान्य असून अर्जदाराची इतर सर्व कथने नाकबुल केलेली आहेत.

जाबदेणार यांच्या कथनानुसार लग्नाचा संपूर्ण खर्च जाबदेणार यांच्या आईवडीलांनी केलेला होता. सदर लग्न संबंधातून जाबदेणार यांचेपासून अर्जदार यांना दोन अपत्ये झालेली आहेत.

**१०.** लग्न झाल्यांनतर १५—२० दिवस अर्जदार या जाबदेणार यांचेकडे कसेबसे नांदल्या. त्यानंतर अर्जदार या जाबदेणार यांना म्हणू लागल्या की, आपण विभक्त राहू, मला एकत्र कुटूंबात रहायचे नाही. त्यावेळी जाबदेणार हे अर्जदार यांना समजावून सांगणेचा प्रयत्न करित होते. परंतु अर्जदार या विभक्त राहणेचे कारणांवरून जाबदेणार यांचेसोबत भांडणतंटा करित असत व घरातील कोणतिही काम न करता दिवस—दिवस झोपून राहणे, स्वयंपाक न करणे, कपडे न धुणे असे प्रकार करित असत. जाबदेणार यांनी अर्जदार यांच्याकडे विचारणा केली असता त्या घरात आदळआपट करित असत.

**११.** तसेच अर्जदार या जाबदेणार यांना म्हणत की, तु तुंडा आहे, तुला उजव्या हाताने काम करता येत नाही, माकडतोंडया वेगळे राहायचे असेल तर बोल असे म्हणून जाबदेणार यांचा सतत अपमान करित असत. जाबदेणार यांचे घरातील लोकांशी देखील किरकोळ कारणांवरून वादविवाद करित होत्या. परंतु जाबदेणार यांना अर्जदार यांचेबरोबर संसार करावयाचा असल्याने व दोन अपत्ये असल्याने अर्जदार यांचा सर्व त्रास सहन करून त्यांना चांगले नांदवित होते.

**१२.** अर्जदार या दुसरे अपत्याचे वेळी ७ महिन्याची गरोदर असताना कोणालाही न सांगता माहेरी निघून गेल्या. अर्जदार यांचा दिनांक ०३/०४/२०१३ रोजी बाळंतपण झाले. त्यावेळी जाबदेणर यांचे आई, वडील, भाऊ हे अर्जदार यांना भेटण्यास गेले असता त्यांची विचारपूस केली नाही. तरी देखील जाबदेणार यांचे आई, वडील, व भाऊ यांनी अर्जदार यांची विचारपूस केली व नांदणेस कधी येणार अशी विचारणा केली असता त्यास अर्जदार यांनी काहीएक प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर जाबदेणार व त्यांचे भाऊ अर्जदार यांचेकडे जाऊन जाबदेणार क्र. १ यांना अर्जदार यांचेबरोबर संसार करणेची तीर्व इच्छा असल्याने अर्जदार यांचे मताप्रमाणे विभक्त राहण्याचे मान्य

केले व नांदणेस येणेची विनंती केली. तरी देखील अर्जदार या नांदावयास आल्या नाहीत.

**१३.** असे असताना देखील जाबदेणार यांनी अर्जदार यांना नांदविणेस आणणेचा प्रयत्न सोडले नाहीत. अर्जदार यांचे कपडेलत्ता, मुलांचे खाण्याचा, औषध उपचाराबाबत चौकशी त्यांची उपाय योजना केली. जाबदेणार यांनी कधीही अर्जदार यांना शारिरीक, मानसिक, आर्थिक त्रास दिलेला नव्हता व नाही. जाबदेणार यांनी स्वत: व पैपाहूणे, नातेवाईक यांचेमार्फत अर्जदार यांना नांदणेस आणणेचा प्रयत्न केला. परंतु अर्जदार या जाणीवपूर्वक जाबदेणार यांचा स्वमर्जीने त्याग करून माहेरी राहत आहे. तसेच माहेरी राहून शिलाई मशनिचे कामे करून तसेच दुधाचा व्यवसाय करित आहेत व आई, वडील व भावास शेतीचे कामात मदत करित आहे. त्यामुळे अर्जदार यांना उदरनिर्वाहाचे चांगले साधन आहे. त्यामुळे अर्जदार यांना उचलून पोटगी देण्याची गरज नाही. जाबदेणार हे आजही अर्जदार यांना नांदणेस घेऊन जाणेस तसेच मुलांचा सांभाळ करणेस सदैव तयार आहेत. त्यामुळे जाबदेणार यांनी बारामती येथील न्यायालयात मॅ. पि. नं. १४७/२०२१ हा अर्ज अर्जदार या नांदावयास येणेकामी दाखल केला होता व सदर अर्जामध्ये अर्जदार व जाबदेणार यांचेमध्ये तडजोड होऊन अर्जदार यांचे मर्जीनुसार विभक्त राहणेचे अटीवर अर्जदार या जाबदेणार यांचेकडे नांदणेस आल्या. परंतु अर्जदार या काही महिने व्यवस्थित राहिल्या. परंतु पुढे त्यांना जाबदेणार सोबत संसार करणेची इच्छा नसल्याने त्या वारंवार पूर्वीप्रमाणेच जाबदेणार यांचेशी भांडणतंटा, वादविवाद करू लागल्या व स्वत:हून जाबदेणार यांचा त्याग करून माहेरी निघून गेल्या.

**१४.** अर्जदाराची गरज, उभयांताचा राहणीमानाचा दर्जा व जाबदेणार यांचे मासिक उत्पन्न आणि त्यांचेवर असलेली जबाबदारी विचारात घेता अर्जदार क्र. १ यांना दरमहा रक्कम रूपये १,०००/— व अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा रक्कम रूपये ५००/— प्रत्येकी अशी अंतरीम पोटगी म्हणून अर्ज दाखल तारखेपासून मंजूर करणे न्यायोचित ठरेल. प्रस्तुतचा अर्ज हा अंतरिम पोटगीचा

असल्याने, अर्जातील गुणानुगुणांचा विचार न करता, या घडीला अर्ज निकाली होणेस लागणारा कालावधी लक्षात घेवून तसेच अर्जदाराने नमूद केलेली कारणे लक्षात घेवून, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१.** प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजूर करणेत येत आहे.

**२.** जाबदेणाराने या अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार क्र. १ यांना दरमहा रक्कम रूपये १,०००/— (एक हजार फक्त) अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा रक्कम रूपये ५००/— प्रत्येकी मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून देण्याची आहे.

स्वाक्षरित/—
(जे.बी. खटावकर)
दिनांक : ०६/०२/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.

| प्रमाणपत्र<br>मी याद्वारे असे प्रमाणीत करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर हा मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दानुसार समान आहे. | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :: | श्रीमती. जे.बी.खटावकर,<br>४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :: | पी.डी.दुधभाते, लघुलेखक निम्नश्रेणी—३. |
| आदेशाची तारीख | :: | ०६/०२/२०२४ |
| न्यायालयाने सही केल्याची तारीख | :: | ०६/०२/२०२४ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :: | १३/०२/२०२४ |